
# पश्चिम महाराष्ट्र राज्य सहकारी मंडळावर डॉ. प्रताप पाटील यांचे वर्चस्व कायम

## संचालकपदी श्रीरामपूरचे प्रा. डॉ. गणी पटेल

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** पश्चिम महाराष्ट्र राज्य सहकारी मंडळाच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत विद्यमान अध्यक्ष डॉ.प्रताप पाटील यांनी दुसर्‍यांदा वर्चस्व सिद्ध केले आहे. त्यात संचालकपदी श्रीरामपूर तालुक्यातील लाडगाव येथील प्रा.डॉ. गणी पटेल यांची दुसर्‍यांदा संचालकपदी निवड झाली आहे.

या मंडळाच्या कार्यक्षेत्रात पश्चिम महाराष्ट्र, कोकण, विदर्भ व खानदेशातील एकूण १४ जिल्ह्यांचा समावेश होतो. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत प्रताप पाटील यांच्या पॅनलचे सर्व उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. त्यात डॉ. प्रताप पाटील, सोले पाटील, जयमाला सातकर, सुरेश खैरे,





डॉ. वसंतराव देशमुख, समीर सोनवणे, मानसिंगराव साठे, नागोंडा हुल्यालकर, यादव पाटील, जयदत्त पाटील, शरद थोरात, मोहनराव पाटील, संदीप पाटील आडमुठे, प्रा. डॉ. गणी पटेल, सुवर्णा पाटील, पुष्पमाला करांडे, अमित रणभिसे, शरद गुरव, उदयसिंग राजपूत यांचा समावेश आहे.

उपनिबंधक सहकारी संस्था तथा निवडणूक अधिकारी मिलिंद टाकसाळे यांनी निवडणुकीचा निकाल नुकताच घोषित केला आहे. डॉ. गणी पटेल हे अशोक कारखान्याचे माजी संचालक शेख लाल पटेल यांचे ते कनिष्ठ बंधू असून श्रीरामपूर येथील पटेल क्लिनिकचे डॉ. रियाज पटेल यांचे ते काका आहेत. प्रा.डॉ. गणी पटेल यांच्या या निवडीबद्दल लाडगाव सोसायटीचे चेअरमन दत्ता भांड, अच्युतराव भांड, माजी सरपंच संदीप चोरगे, बाबासाहेब भांड, दिलीप भांड, सरपंच आजम पटेल, सोसायटीचे व्हाईस चेअरमन जमशेद पटेल, संपत भांड, भाऊसाहेब क्षीरसागर, राधाकिसन भांड, हमीद पटेल, शेख खुदाबक्ष, शेख मुन्ना अब्बास, गोरक्षनाथ बडाख, सोपान भांड, विष्णू भांड, मच्छिंद्र थोरे ज्ञानेश्वर थोरे, विठ्ठल पवार आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# अस्तगावला १० फूट उंचीचे गणपती

## गणेशमूर्ती खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी, परराज्यातही बाप्पांना मागणी

**राहाता (तालुका प्रतिनिधी)–** राहाता तालुक्यातील अस्तगाव येथील कारागिरांनी बनविलेल्या आकर्षक गणपतींच्या मुर्ती खरेदीसाठी गणेश मंडळांची तसेच वैयक्तिक खरेदीदारांची पावले अस्तगावच्या दिशेने वळाली आहेत. अनेक गणेश मंडळांनी गणपतीची बुकींगही केली आहे. यंदा विठ्ठल रुपातही माठ्या आकारात गणपतीने ग्राहकांना आकर्षित केले आहे.

येथील कारागिरांनी रंगविलेल्या गणेश मुर्ती आकर्षक आणि देखण्या असल्याने गणरायाला खरेदी करण्यासाठी मोठी गर्दी येथील कुंभार गल्लीत होत आहे. दररोज गणपती खरेदीसाठी गणेश भक्त, विविध मंडळे दाखल होत आहेत. शेवटचे काही दिवस उरल्याने कारागिरांची काही मुर्तींना रंगविण्याचे काम वेगात सुरु आहे. यात महिला तसेच लहान मुलांचाही समावेश आहे. ६ इंचापासुन तर ८ ते १० फुटा पर्यंत गणेशाच्या मुर्ती येथे मिळत असल्याने जिल्ह्यातूनच नव्हे तर जिल्ह्याबाहेरुन ग्राहक गणपती खरेदीसाठी अस्तगावला येत आहेत. यंदा कर्नाटक, मध्यप्रदेश, गुजरात, तेलंगना या राज्यातही येथील गणपती गेले आहेत, अशी माहिती कारागिर निलेश अष्टेकर यांनी सांगितले.

१० ते १२ कुटुंब या गणपतीची आखणी करतांना दिसतात. पुर्वी येथील कारागिर शॅडोच्या गणपती मुर्ती बनवत असत. अलिकडच्या काही वर्षापासुन प्लॅस्टर ऑफ पॅरिस पासुन मुर्ती बनविल्या जातात. या मुर्ती आखीव व रेखीव असल्याने त्यावर आकर्षक रंग संगती केली जात असल्याने



ग्राहकांच्या मनात सर्वच मुर्ती बसत आहेत. यावर्षी गणेश मुर्ती विविध देखाव्यात आहेत. विठ्ठल रुपातील गणपती, महादेव रुपातील, कृष्ण रुपातील, दगडूशेठ, टिटवाळा, चिंचपोकळीचा राजा आदिंसह ग्राहक तसेच गणेश मंडळांच्या मागणीनुसार असे विविध, नेहमीच्या धाटणीतही गणेशाच्या मुर्ती कारागिरांनी बनविल्या आहेत. अस्तगाव येथील प्रत्येक कारागिराने यंदा २ ते अडीच हजार मुर्ती बनविल्या आहेत.

सहा महिन्यांपासून येथील कुंभार समाजातील कुटुंबे यात गुंततात. राजस्थान येथील बाडमेल येथुन प्लॅस्टर ऑफ पॅरिस ट्रकद्वारे येथे घेवुन येतात. कच्चा माल तसेच अन्य मेटेरियल आणुन ते मुर्ती साचेद्वारे आकारतात. जानेवारी पासुनच हे काम सुरु होते. साधरणत: मे पासुन रंगरंगोटी सुरु करतात. यात घरातील सर्व महिला, पुरुष, तसेच लहान मुलेही सहभागी होतात.

आकर्षक मुर्ती अनेक सार्वजनिक गणपती मंडळे, तसेच वैयक्तिकरित्याही गणपती आगोदरच बुक केले जातात. ज्या दिवशी गणपती स्थापित करायचे किंवा त्या आगोदरही काही जण गणपती चार चाकी वाहनातुन घेवुन जातात. शेवटच्या दोन दिवसात अस्तगाव ला येणारे जाणारे रस्ते गणपतींच्या जयघोषात गणराया वहानांवर विराजमान होवुन जातात. पुर्वी ज्वारीच्या उत्पादनात, मंडपसाठी, बँडसाठी, गुलाबाच्या नर्सरी, डाळींब नर्सरींसाठी, प्रसिध्द असलेले अस्तगाव गणपतीच्या मुर्तीसाठी चांगलेच प्रसिध्द आहे. न्यायालयाने प्लॅस्टर ऑफ पॅरिस पासुन गणपती बनविण्यास परवानगी दिल्यानंतर ९ जून नंतर लगबग करुन गणपती बनविले गेले, असे निलेश अष्टेकर यांनी सांगितले.

# पोलीस अधिकाऱ्याकडून अपमानास्पद वागणूक

## कारवाईची पोलिस अधिक्षकांकडे पानसरेंची मागणी

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** पोलिस ठाण्यात आपल्याला अपमानास्पद वागणूक मिळाली असून याबाबत चौकशी होवून योग्य ती कारवाई व्हावी अशी मागणी जिल्हा पालिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांच्याकडे सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र पानसरे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात पानसरे यांनी म्हटले की, श्रीरामपूरातील कांदा मार्केटजवळ कुटुंबासह कायमस्वरुपी वास्तव्यास आहे. माझ्यावर ऑक्टोंबर २०१५ मध्ये एक गुन्हा दाखल झाला होता. त्यावेळी तपासाचा भाग म्हणून तपास अधिकारी यांनी माझे बँक खाते सील करुन व्यवहार थांबविले होते. सदर गुन्हयाचा तपास होऊन न्यायालयात आरोपपत्र दाखल झाले आहे. तसेच नासिक मर्चन्ट को. ऑफ बँकेमध्ये माझ्या खात्यात पैसे असल्याने मी बँकेतून पैसे काढण्यासाठी गेलो असता बँकेने मला पैसे देण्यास नकार दिला म्हणून मी बैंक अधिकारी यांना तपास संपून आरोपपत्र कोर्टात गेल्याचे सांगितले. बँकेच्या अधिकाऱ्याने मला खुलासासाठी पोलीस अधिकाऱ्याच्या नावाने पत्र दिले. मी ते पत्र घेऊन संबंधित अधिकाऱ्याची भेट घेतली व त्यांना ते पत्र देऊन बँकेला खुलासा देण्याबाबत विनंती केली. परंतू या अधिकाऱ्याने माझे काहीही ऐकून न घेता व पत्र न वाचता ते पत्र फेकून दिले व मला अपमानास्पद वागणूक दिली. एवढेच नव्हेतर कार्यालयाबाहेर हुसकावून दिले आणि परत इकडे यायचे नाही असाही दम दिला. माझे आणि माझे कुटुंबियाचे कुठल्याही प्रकारे गुन्हेगारी स्वरुपाचे वर्तणूक (रेकॉर्ड) नाही. मी स्वत: .प्रतिष्ठीत व्यापारी, शेतकरी आहे, माझी पत्नी सौ. अर्चना संजय पानसरे या गेली १५ वर्षापासून नगरसेविका म्हणून काम करत आहे व सध्या माझी पत्नी सौ. अर्चना संजय पानसरे ही राष्ट्रवादी अजित पवार गट या पक्षाची श्रीरामपूर महिला शहराध्यक्ष म्हणून काम करत आहे.तरीही आमच्या सारख्या प्रतिष्ठत व्यक्तीला पध्दतीने वागविणे योग्य नाही. तसेच गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलिस ठाण्यात आलेल्या प्रत्येक व्यक्तीला सन्मानाची वागणूक द्यावी अशा सूचना दिलेल्या आहेत. असे असतानाही काहींकडून त्याला केराची टोपली दाखविली जाते. यामुळे पोलिसांबाबत समाजत वेगळी प्रतिमा तयार होते. या प्रकाराची चौकशी होवून योग्य ती कारवाई करावी.

# नमो योजनेचा हप्ता रखडल्याने शेतकरी नाराज

**पिंपरी निर्मळ (वार्ताहर)–** राज्यातील तसेच देशातील शेतकऱ्यांना आधार मिळावा यासाठी केंद्र सरकारने पीएम किसान योजना सुरू केली आहे. याच धर्तीवर राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी नमो शेतकरी सन्मान योजना सुरू केली. मात्र या योजनेचा हप्ता न आल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये या योजनेबाबत संभ्रम तयार झाला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील शेतकऱ्यांना आधार मिळावा यासाठी पीएम किसान योजना सुरू केली आहे. या अंतर्गत दर तीन महिन्याला शेतकऱ्यांना दोन हजार रुपये मिळून सहा हजार रुपये वर्षभर मिळतात. याच धर्तीवर राज्य सरकारने नमो शेतकरी सन्मान योजना सुरू केली आहे. यामध्ये केंद्राप्रमाणे राज्य सरकार शेतकऱ्यांना समान निधी


> ▸ या योजनेतून केंद्र सरकार प्रत्येक चार महिन्याला दोन हजार रुपये असे सहा हजार शेतकऱ्यांना देते. फडणवीस सरकारने यात वाढ करून प्रत्येक चार महिन्याला तीन हजार असे नऊ हजार रुपये देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र यावर अद्याप पर्यंत कार्यवाही नाही. शेतकरी वर्ग कर्जबाजारीपणामुळे प्रचंड अडचणी असल्याने शासनाने कार्यवाही करावी.
>
> **–अशोक घोरपडे**, शेतकनी पिंपरी निर्मळ

देणार आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत सहा हजार ऐवजी नऊ हजार रुपये देण्याची घोषणा फडणवीस सरकारने केली होती. मोदी सरकारने शेतकऱ्यांना केंद्र सरकारच्या पीएम किसान योजने अंतर्गत चालू तीन महिन्यांचा हप्ता वर्ग केला आहे. राज्य सरकारकडून नमो शेतकरी योजनेअंतर्गत मिळणारा वाढीव तीन हजारांचा हप्ता बाजूला राहिला असून नियमित दोन हजारांचा अद्यापपर्यंत वर्ग केलेला नाही. त्यामुळे शेतकरी वर्गातून या योजनेबाबत शंका व्यक्त केली जात आहे. लाडकी बहीण योजनेचा फटका राज्यातील बहुतांश योजनेला बसलेला आहे. हाच फटका शेतकऱ्यांसाठी वरदान ठरलेल्या नमो शेतकरी जीवनाला बसला का, असा प्रश्न शेतकरी बांधवांमध्ये तयार झाला आहे. राज्य सरकारने दिलेल्या शब्दाचे पालन करावे, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# येवले आखाडा येथे बिबट्याच्या हल्ल्यात पाच शेळ्या व दोन बोकड ठार

**राहुरी (तालुका प्रतिनिधी)–** राहुरीतील येवले आखाडा येथील सुतगिरणी परिसरात राखणदार म्हणून काम करणारे माणिक आसरु सोनटक्के यांच्या शेळ्यांच्या कळपावर शुक्रवारी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास बिबट्याने हल्ला करून पाच शेळ्या आणि दोन बोकड ठार केले. या घटनेमुळे परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास माणिक सोनटक्के यांच्या शेळ्याच्या कळपांवर बिबट्याने हल्ला चढवला. शेळ्यांचा आरडाओरडा ऐकून सोनटक्के यांनी त्या दिशेने



धाव घेतली. सोनटक्के यांनी आरडाओरड करून बिबट्याला हुसकावण्याचा प्रयत्न केला. मात्र, बिबट्याने त्यांच्यावरही हल्ला करण्याचा प्रयत्न केला आणि एक शेळी घेऊन धुम ठोकली. आराडाओरड ऐकून परिसरातील रहिवाशी सोनटक्के यांच्या मदतीला धावले. या घटनेची माहिती वन विभागाला कळवण्यात आली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन वन विभागाचे वनपाल राजेंद्र रायकर, वामन लांबे, वनरक्षक राजू घुगे, प्रदीप कोहकडे, चालक ताराचंद गायकवाड यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. या घटनेत सोनटक्के यांचे कमीत कमी लाख ते सव्वा लाख रुपयांचे मोठे नुकसान झाले आहे. यावेळी तहसीलदार तसेच वनविभाग अधिकारी यांनी सोनटक्के यांना ४५ दिवसांच्या आत पूर्णपणे मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले. तसेच वनविभागाने तात्काळ पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करावे, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

# आ. काळेंच्या प्रयत्नातून उजनी टप्पा क्रमांक एक सुरु- थेटे

**कोपरगाव (प्रतिनिधी)–** उजनी उपसा सिंचन योजनेच्या टप्पा क्रमांक एकच्या शहापुर येथील ३१५ केव्हीए क्षमतेच्या ट्रान्सफार्मरमधील ऑईल व तांब्याच्या कॉईल अज्ञात व्यक्तीने चोरून नेल्यामुळे जवळके, धोंडेवाडी, शहापूर, बहादराबाद या गावातील पाझर तलाव आणि साठवण बंधारे भरण्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. परंतु आ. आशुतोष काळे यांनी चोरी गेलेल्या ट्रान्सफॉर्मरच्या जागी भाडेतत्त्वावर नवीन ट्रान्सफॉर्मर बसवला असून उजनी टप्पा क्रमांक एक सुरू झाला असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते संदीप थेटे यांनी दिली.

निळवंडे कालव्याच्या लाभक्षेत्रातील काकडी, मल्हारवाडी, डांगेवाडी, मनेगाव, रांजणगाव देशमुख, वेस, सोयेगाव, अंजनापूर, बहादरपूर आणि राहाता तालुक्यातील चितळी, धनगरवाडी, वाकडी या गावातील पाझर तलाव, साठवण बंधारे, ओढे पूर्ण क्षमतेने भरले आहेत. ज्या ठिकाणी निळवंडे कालव्याचे पाणी पोहोचू शकत नाही, त्या ठिकाणी गोदावरी कालव्याच्या



ओव्हर फ्लोच्या पाण्यातून उजनी उपसा सिंचन योजनेच्या टप्पा क्रमांक एक मधून त्या गावातील पाझर तलाव आणि साठवण बंधारे भरून दिले जात आहेत. परंतु यावर्षी या टप्पा क्रमांक एकच्या ट्रान्सफॉर्मरमधील ऑईल व तांब्याच्या कॉईल अज्ञात व्यक्तीने चोरून नेल्यामुळे या गावातील नागरिकांच्या चिंता वाढल्या होत्या. या चिंता आ. काळे यांनी नवीन ट्रान्सफॉर्मर बसवून दूर करण्यात आले आहेत. त्यामुळे या गावातील साठवण तलाव, बंधारे आणि ओढे भरण्यास सुरूवात झाली आहेत.

> ▸ उजनी उपसा जलसिंचन योजना सुरू ठेवण्यासाठी सर्व प्रकारची जबाबदारी घेण्याचा मी शब्द दिला आहे आणि दिलेला शब्द मी कधीही पडू देणार नाही. सिमेंट पाईप टाकून निळवंडेचे पाणी या चारही गावात आणण्यासाठी पाठपुरावा सुरू आहे. जोपर्यंत निळवंडेचे पाणी या चार गावात येत नाही, तोपर्यंत उजनी उपसा जलसिंचन योजना सुरूच राहील. ट्रान्सफॉर्मरमधील ऑईल आणि तांब्याच्या कॉईल चोरट्यांनी चोरून नेल्यामुळे योजना सुरू होण्यास उशीर झाला. भविष्यकाळात अशा अडचणी येणार नाहीत यासाठी लाभधारक गावातील नागरिकांनी यापुढे काळजी घ्यावी.
>
> **–आ. आशुतोष काळे**

## पान १ वरुन

### लाडक्या बहिणींची पुन्हा...

अबिटकर यांच्या कोल्हापूर जिल्ह्यात १ लाख १४ हजार बोगस लाडक्या योजनेत लाभार्थी ठरल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागपुरात ९५ हजार ५००, आदिती तटकरे यांच्या रायगड जिल्ह्यात ६३ हजार बोगस लाडक्या बहिणी अपात्र ठरल्या आहेत. पंकजा मुंडे यांच्या बीड जिल्ह्यात ७१ हजार बोगस लाडक्या बहिणींची नोंद आढळली आहे. बाबासाहेब पाटील यांच्या लातुरात ६९ हजार लाडक्या बहिणींनी लाभ घेतल्याचे उघड झाले आहे. यावर उपमुख्यमंत्री अजित पवारांनी प्रतिक्रिया देताना मग योजना बंद करू का? असे म्हटले आहे.

### अंगणवाडी सेविकांकडून...

१५ दिवसांपूर्वी पुन्हा १ हजार २५ हजार महिलांची दुसरी यादी महिला बालकल्याण विभागाला पाठवण्यात आली. या यादीनुसार एकाच कुटूंबातील दोन किंवा त्यापेक्षा अधिक लाभार्थी असणाऱ्या लाडक्या बहिणीची प्रत्यक्षात अथवा फोन करून पडताळणी करण्याचे तोंडी आदेश अंगणवाडी सेविकांना देण्यात आलेले आहेत. मात्र, योजनेतील पात्र महिलांची नावे कमी करतांना संबंधीत गावात अंगणवाडी सेविका व लाडक्या बहिण योजनेतील महिला यांच्यात वाद होण्याची शक्यता असल्याने याकामास अंगणवाडी सेविका कर्मचारी युनियनच्यावतीने या कामास नकार दर्शवला आहे. या शिवाय अंगणवाडी सेविकांचे पोषण आहारचे मुख्य काम बंद पडणार असल्याचे कारण पुढे करण्यात आले आहे. यामुळे नगर जिल्ह्यात गेल्या १५ दिवसात १ लाख २५ हजार संशयीत लाडक्या बहिणींपैकी अवघ्या ४० हजार महिलांची पडताळणी होवू शकलेली आहे. या पुढे अंगणवाडी सेविकांनी हे काम करण्यास नकार दिल्यास राज्य सरकार अन्य शासकीय यंत्रणांकडे हे काम सोपावून लाडक्या बहिणींची पडताळणी करणार आहे. त्यादृष्टीने सरकारकडून महिला बालकल्याण विभागात चाचपणी करण्याच्या सुचना देण्यात आल्याचे सुंत्राकडून सांगण्यात आले.

### संगमनेरची जनताच जायंट...

तरी लाडकी बहीण योजना कधीही बंद होणार नाही. आमचं सरकार दिलेला शब्द पाळणारं आहे.

माजी मंत्री थोरातांवर टीका करताना म्हणाले, साखर कारखाना, दूध संघ, महाविद्यालये त्यांची मग दूध त्यांचं, चहा त्यांचा, बिस्कीट त्यांचं, मलाई त्यांची मग जनतेला काय धतुरा? असा तिखट सवाल करत आपला माणूस सेवावाला आहे मेवावाला नाही. आता विरोधकांनी वोटचोरीचा आरोप केला पण, खरेतर त्यांचा मेंदू चोरीला गेला आहे. पहलगाम हल्ल्याला पतप्रधान नरेंद्र मोदींनी जोरदार प्रत्युत्तर दिलं. ऑपरेशन सिंदूर व महादेव करून अतिरेक्यांचा खात्मा केला. परंतु, विरोधक पाकिस्तानची बोली बोलताय ही त्यांची देशभक्ती आहे का? अशा वेगवेगळ्या मुद्द्यांवरुन चांगलीच टीका केली. वारकऱ्यांवर हल्ला करतात हे कसलं हिंदुत्व असा प्रतिसवाल करुन त्यांच्या केसालाही धक्का लावायची हिंमत कोणी करू नये असा इशारा दिला. आपलं सर्वसमान्य जनतेचं सरकार असून शेतकरी कर्जमाफी देखील करणार आहे असा विश्वास देऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, राधाकृष्ण विखे पाटील सर्वजण तुमच्या पाठिशी असून, जनतेने दिलेल्या आशीर्वादाबद्दल आभार मानले.

आमदार खताळ म्हणाले, सत्यजीत तांबे म्हणतायेत ते सत्ताधारी पक्षाचे आमदार आहे. परंतु, फोटो काढून व्हायरल केले म्हणजे सत्ताधारी होत नाही. त्याला पक्षाच्या चिन्हावर निवडून यावं लागतं. आता संगमनेर शहर व तालुक्यात कुणाचीही दहशत राहिली नाही. आता आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत भगवा फडकवायचा आहे, असा विश्वासही व्यक्त केला. सभेच्या प्रारंभी राज्यगीत तर शेवटी राष्ट्रगीत झाले.

### मराठा आरक्षणाचा मुद्दा...

भाजपच्या एकाही आमदार, मंत्र्याला रस्त्यावर फिरू देऊ नका असा असं यावेळी जरांगे पाटील म्हणाले. सत्तेच्या जीवावर उड्या मारू नका. आता कोणत्या ही स्थितीत माघार नाही. आरक्षण घेतल्या शिवाय आता मागे फिरायचं नाही. गुलाल उधळतच परत यायचं असा निर्धारही यावेळी जरांगे पाटील यांनी केला आहे.

२ वर्षानंतर पुन्हा एकदा जरांगे पाटलांनी चलो मुंबईचा इशारा दिला आहे. यावेळी अवघ्या २ दिवसातच मुंबईत धडकण्याच्या सूचना मराठा समाजाला त्यांनी केल्या आहेत. २७ ऑगस्टला जालन्याच्या अंतरवाली सराटीतून ते निघणार आहेत. त्यानंतर शहागड, बीड मार्गेपैठण, संभाजीनगर, अहिल्यानगर मार्गेआळेफाटा पुढे मुंबईला जाणार आहे. दरम्यान, मुख्यमंत्री फडणवीस यांनी मराठा समाजाला १० टक्के आरक्षण दिले आहे. असे असतानाही कुणी लोकशाही मार्गाने आपले म्हणणे मांडत असेल तर तेही ऐकून घेऊ असे स्पष्ट केले. मराठा समाजाला आरक्षण देण्यात आले आहे. मराठा समाजाला सरसकट आरक्षण देता येत नाही असे सुप्रीम कोर्टाने स्पष्ट केले आहे. असे असतानाही कुणी दबाव आणीत असेल तर ओबीसी समाजही गप्प बसणार नाही, असा इशारा मंत्री छगन भुजबळ यांनी दिला आहे.

### धार्मिक स्थळाची तोडफोड...

प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण कबाडी, कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे, तोफखाना पोलीस ठाण्याचे निरीक्षक आनंद कोकरे यांनी फौजफाट्यासह घटनास्थळी धाव घेतली. महापालिकेच्या पथकाला पाचारण करण्यात आले. तोडफोड झालेल्या ठिकाणी दुरूस्तीचे काम तात्काळ हाती घेतले. घटनेची माहिती सकाळी शहरात वाऱ्यासारखी पसरताच नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. परिसरात पोलिसांचा बंदोबस्त तैनात असून कोणताही अप्रिय प्रकार घडू नये यासाठी दक्षता घेतली जात आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे.

**समाजकंटकांची धरपकड**

पोलिसांनी घटनास्थळी परिस्थिती नियंत्रणात आणल्यानंतर तोडफोड करणाऱ्या समाजकंटकांची धरपकड सुरू केली. स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी योगेश सखाराम झोंड (रा. धोंडेवाडी रस्ता, वाळकी, ता. अहिल्यानगर) व जेसीबी चालक बबलु रामभाऊ पाल (रा. बोरूडे मळा, अहिल्यानगर, मुळ रा. बनारास, उत्तरप्रदेश) यांना ताब्यात घेतले. योगेश झोंड याने त्याच्या साथीदारांच्या मदतीने हा प्रकार केल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासात समोर आले आहे. दरम्यान, कोतवाली पोलिसांनी तिघा संशयितांना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडे चौकशी केली जात आहे. इतर संशयितांची धरपकड पोलिसांकडून सुरू आहे.

**मुस्लिम बांधवांचा मोर्चा**

घटनेची माहिती समजल्यानंतर मुस्लिम समाज आक्रमक झालेला पाहिला मिळाला. दुपारनंतर त्यांनी मोर्चाचे नियोजन केले. कोठला येथे एकत्र येत कोठला ते पोलीस अधीक्षक कार्यालय असा मोर्चा काढण्यात आला. हातात विविध घोषवाक्य असलेले फलक घेऊन मोठ्या प्रमाणात मुस्लिम बांधव मोर्चात सहभागी झाले होते. यावेळी घोषणाबाजी करण्यात आली. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना निवदेन देण्यात आले असून संशयित आरोपींना अटक करावी, मुख्य सूत्रधार शोधावा आदी मागण्या निवेदनाव्दारे करण्यात आल्या आहेत.

### प्ले ग्रुप, नर्सरी यांच्या शुल्क...

समावेश करण्यात आलाय. प्राथमिक शाळांशी संलग्न नसल्या तरी नर्सरी, प्ले ग्रुप, ईसीसीई केंद्रे, ज्युनियर व सीनियर केजीचा समावेश या असेल. हा मसुद्यावर राज्यातील शालेय शैक्षणिक विभागातील उच्चस्तरीय अधिकाऱ्यांकडून अभिप्राय मागवण्यात आलाय. जर हा कायदा लागू झाला तर सहा महिन्यांच्या आत सर्व विद्यमान पूर्व प्राथमिक शाळांना सरकारकडे नोंदणी करणे बंधनकारक असणार आहे. तसेच कायद्याच्या अमंलबजावणीनंतर सुरू होणाऱ्या नवीन शाळांना पूर्वपरवानगी आणि नोंदणी घेणे बंधनकारक असणार आहे.

दरम्यान सरकारच्या अखत्यारीतील अंगणवाडी केंद्रे आणि एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत चालणारी केंद्र या नियमांपासून वगळण्यात आली आहेत. २०२३मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करताना पूर्व प्राथमिक शिक्षण हे शालेय शिक्षण विभागाशी जोडणे अनिवार्य करण्यात आलंय. नोंदणीकृत ट्रस्ट, संस्था, सहकारी संस्था, भागीदारी फर्म आणि वैयक्तिक नोंदणीकृत व्यक्तींना अशा शाळा सुरू करण्याची परवानगी राहील.

### गणेश चतुर्थीपूर्वी आगाऊ...

मंत्रालयाकडून जारी करण्यात आलेल्या निवेदनात ही देयके आगाऊ देयके म्हणून गणली जातील.

जारी केलेले पगार, पेन्शन आणि वेतन ऑगस्ट/सप्टेंबर २०२५ च्या अंतिम सेटलमेंटमध्ये समायोजित केले जाणार आहेत. अशा प्रकारे वितरित केलेला पगार/मजुरी/पेन्शन आगाऊ रक्कम म्हणून गणला जाईल आणि प्रत्येक कर्मचारी/पेन्शनधारकाच्या संपूर्ण महिन्यासाठी पगार/मजुरी/पेन्शन निश्चित केल्यानंतर समायोजनाच्या आधीन असेन., असे अर्थमंत्रालयानं म्हटलंय. दरम्यान मंत्रालयाने रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ला केरळ आणि महाराष्ट्रातील बँकांच्या शाखांना पगार आणि पेन्शनची आगाऊ रक्कम देण्याची योजना कोणत्याही विलंबाशिवाय लागू करण्याचे निर्देश देण्याची विनंती केलीय.